महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
www.rmvs.marathi.gov.in; इ-टपाल : rmvsmumbai@gmail.com; rmvs_mumbai@yahoo.com

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती

# राज्य मराठी विकास संस्था

## सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

**कार्यालयाची आवश्यकता:-**

सामान्य प्रशासन विभाग यांच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासननिर्णयानुसार, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ४००००१ येथे शासकीय सेवेतून गट- अ या संवर्गातील पदावरुन रुपये ७६००/- ग्रेड पे पेक्षा कमी (सहाव्या वेतन आयोगानुसार) संवर्गीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची करार पद्धतीने राज्य मराठी विकास संस्थेमध्ये कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक, आस्थापनाविषयक व लेखाविषयक या 'विवक्षित स्वरुपाची कामे' करण्यासाठी नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | किमान अर्हता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना विषयक कामकाजासाठी (ग्रेड पे ५४०० ते ७६०० या मधील सेवानिवृत्त अधिकारी) | १. उमेदवार शासकीय सेवेतून कक्ष अधिकारी, अवर सचिव अथवा उपसचिव या पदावरून किंवा वरील पदांच्या समकक्ष पदांवरुन सेवानिवृत्त झालेला असावा.<br>२. उमेदवारास मंत्रालयीन स्तरावरील तसेच इतर शासकीय कार्यालयातील प्रशासकीय विषयक कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. | १ |
| २. | लेखा विषयक कामकाजासाठी (ग्रेड पे ५४०० ते ७६०० या मधील सेवानिवृत्त अधिकारी) | १. उमेदवार शासकीय सेवेतून कक्ष अधिकारी, अवर सचिव अथवा उपसचिव या पदावरून किंवा वरील पदांच्या समकक्ष पदांवरुन सेवानिवृत्त झालेला असावा.<br>२. उमेदवारास मंत्रालयीन स्तरावरील तसेच इतर शासकीय कार्यालयातील लेखा विषयक कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. | १ |

अटी व शर्ती

१. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण २७१५/ प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२. उपरोक्त पदे ही शासन सेवेतील नियमित पदे नाहीत.
३. या पदांवरील भरती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील व सुरवातीला १ वर्षाच्या कालावधीसाठी मर्यादित राहील.
४. सदर पदे करार पध्दतीने भरण्यात येतील. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी पदासाठी दावा करता येणार नाही अथवा हा अनुभव ग्राह्य असणार नाही.
५. सदरबाबत अधिक माहितीसाठी या कार्यालयाच्या rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.
६. उमेदवाराची सेवा व कामाची प्रत याबाबत प्रत्येक महिन्यात कार्यालय प्रमुख आढावा घेतील. काम समाधानकारक न आढळून आल्यास एका महिन्याची पूर्वसूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येतील.

७. सदर पदासाठी सेवानिवृत्त शासकीय अर्ज करण्यास पात्र असतील. त्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १७.१२.२०१६ मधील तरतुदी नुसार परिश्रामिक देय राहील.

८. इतर अटी व शर्ती नियुक्तीबाबतच्या करारान्वये निश्चित करण्यात येतील.

९. कोणतेही कारण न देता अर्ज स्वीकारणे अथवा नाकारणे हा अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था यांचा राहील.

**(डॉ. शामकांत बा.देवरे)**
संचालक
राज्य मराठी विकास संस्था